
# भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

अध्याय तिसरा

सुलभ ओवीबद्ध रचना



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

साहित्य प्रतिष्ठान®

# भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

## अध्याय तिसरा

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)

२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

# श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com

ई प्रकाशन :

## ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

E Sahity Pratishthan

Eleventh floor(G1102)

Eternity

Eastern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख

©श्री विजय पांढरे(२०१२)

**या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.**

प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

# ॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भॆट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

|| ॐ परमात्मने नमः ||

## अध्याय तिसरा

# कर्मयोग

मग अर्जुनाने म्हटले । तुम्ही जे मज सांगितले । ते मी ऐकले । संपूर्ण देवा ||१||
तेथे कर्म आणि कर्ता । उरेचिना पाहता । ऐसे तुझे मत अनंता । जी ब्रह्मस्थिती ||२||
मग मजसी केवि श्रीहरी । म्हणसी अर्जुना युद्ध करी । संकोच न वाटे थोडा तरी । कर्मी मज घालता ||३||
कर्माचा होऊ दे निरास । ऐसे तू बोलतोस । नि प्रवृत्त करतो मज युद्धास । हे कैसे ||४||
हेचि विचारी हृषीकेशा । वर्णितोस ती निष्काम दशा । आणि करवितोस हिंसा । माझ्या करवी ||५||
देवा तूचि ऐसे बोलावे । आम्ही अज्ञान्यांनी काय करावे । आता संपले आघवे । विवेकपण ||६||
कैसा उपदेश करतोस । संभ्रम जाहला मनास । फिटली माझी हौस । आत्मबोधाची ||७||
वैद्याने पथ्य सांगावे । नि आपणचि विष द्यावे । मग रोग्याने कैसे जगावे । सांग मजला ||८||
आंधळ्या आडमार्गे पाठवावे । किंवा माकडा मद्य पाजावे । तैसेच हे आघवे । करू काय आता ||९||
मी काहीच न जाणे । अंध जाहलो मोहाने । कृष्णा याच कारणे । विचारी तुजला ||१०||
निष्कामता शिकविसी । नि युद्ध कर म्हणसी । शरण आलेल्यासी । का असे वागावे ||११||
पहा आम्ही तनमनाने । तुजला शरण येणे । आणि तू ऐसे बोलणे । शोभते का ||१२||
तू ऐसे उपदेशावे । मग आम्ही काय करावे । ज्ञान ते कैसे व्हावे । सांग आम्हा ||१३||
आणिक एक गोष्ट घडली । ज्ञानाची तहान सरली । स्थिर होती ती गडबडली । मन:स्थिती माझी ||१४||
कैसे वागणे तुझे । मला काहीच न समजे । का पहातोस मन माझे । चाचपून देवा ||१५||
फसवितोस का मजला । की सांगतोस तत्त्वज्ञानाला । काही न उमजे चित्ताला । माझ्या आता ||१६||
म्हणून ऐका देवा । उपदेश सोप्या शब्दात द्यावा । मज विवेक तो सांगावा । मराठीत ||१७||
मी जरी बुद्धीहीन असे । परि मला समजेल ऐसे । शब्द ते सोपे तैसे । सांगावे देवा ||१८||
रोग्याचे आजारी पडणे । तया औषध देणे लागणे । मग ते गोड असणे । अनिवार्य देवा ||१९||
वापरून सोप्या शब्दास । सांगावे तत्त्वबोधास । जे समजेल माझ्या मनास । असे देवा ||२०||
भेटता तुज जैसा गुरू । उपदेशाची कामना का न करू । भीड कशाला धरू । तू माय माझी ||२१||
कामधेनु दुभती । जाहली जर प्राप्त ती । मग इच्छांची पूर्ती । का न करावी ||२२||
अडचण कशाची आता । चिंतामणी आला हाता । म्हणून इच्छांची पूर्तता । करावी देवा ||२३||
अमृत सागरापाशी जावे । नि तहानलेलेच रहावे । मग कष्ट का ते घ्यावे । सागरी जाण्याचे ||२४||
अनेक जन्म उपासिता । तू भेटला भगवंता । तू प्राप्त मज असता । काळजी कशाची ||२५||
तरी तू भगवंता । कर तत्त्व बोध आता । तत्त्व जे ऐकता । कल्याण माझे ||२६||
देख भाग्य माझे प्रकटले । आज पुण्य फळा आले । मनोरथ पूर्ण झाले । आज माझे ||२७||
हे परम दैवता । सुखसमृद्धी दाता । अमृताची ती वर्षा आता । कर देवा ||२८||
जैसे मातेच्या ठायी । स्तनपाना वेळ बंधन नाही । अपत्य ते केव्हाही । स्तनपान करी ||२९||
प्रश्न जो मज पडला । विचारीन मी तुजला । करावा बोध मला । भगवंता तू ||३०||



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

होईल परलोकी हित । नि लौकिकात जे उचित । उपदेशावे ते निश्चित । मजला तू ॥३१॥

श्री भगवानुवाच

ऐकून ते अच्युत । म्हणाला होऊन विस्मित । गूढ जे मज उपदेशात । तुज समजले नाही ॥३२॥

बुद्धियोग असता सांगत । मी सांगितले सांख्यमत । विरोधाभास मज उपदेशात । नाही अर्जुना ॥३३॥

उद्देश तू जाणत नाही । म्हणून रागावला पाही । परि मार्ग ते दोन्ही । एकचि अर्जुना ॥३४॥

बघ बा अर्जुना । मी सांगतसे दोन मार्ग दोघांना । सांख्यमत ज्ञान्यांना । कर्मयोग अज्ञजना ॥३५॥

ऐक महत्त्व ज्ञानाचं । जे मत असे सांख्यांचं । शुद्ध मनाने ऐकताच । तत्क्षणी ज्ञान ॥३६॥

दुसरा कर्मयोग जाण । साधना दीर्घकाळ करून । होता कालांतराने निपुण । ज्ञान होई ॥३७॥

हे मार्ग जे दोन । जैसे गहू आणि पोळी जाण । गव्हा लागे दळण । पोळी सिद्ध भोजन ॥३८॥

नद्या भिन्न भिन्न दिसती । परि सागरीच मिळती । तैसी दोहो मार्गांची प्राप्ती । एकच जाण ॥३९॥

ऐसे हे मार्ग दोन । जरी भासती भिन्न भिन्न । ते साधका योग्यते कारण । जाण अर्जुना ॥४०॥

जसा पक्षी तो उडेल । क्षणात फळासी ते झोंबेल । ते इतरांसी कैसे जमेल । सांग अर्जुना ॥४१॥

इतर ते सारे । विविध साधनांच्या आधारे । बा पोहचती मार्गाधारे । हळूहळू ॥४२॥

जैसी पक्ष्यांची अति गती । तैसी ज्ञान्याची ती मती । सांख्य ज्ञानास आकळती । क्षणार्धात ॥४३॥

जे कमी असती योग्यतेत । ते मग कर्मयोग आचरत । ज्ञानास असती पावत । अंती अर्जुना ॥४४॥

कर्मास न जाणता । कैसी पावणे मग नैष्कर्म्यता । केवळ कर्म ते त्यागता । नैष्कर्म्यता नाही ॥४५॥

प्राप्त कर्म न करणे । तरी नैष्कर्म्य होणे । वायाचि ते बोलणे । वायफळ ॥४६॥

आहे पैलतीरा जायचे । म्हणे नावेत नाही बसायचे । तैसे त्यागणे कर्माचे । जाण अर्जुना ॥४७॥

तृप्तीची इच्छा असणे । परि सैपाकच न बनवणे । वा भोजनच न करणे । असता सैपाकही ॥४८॥

प्रकटते अर्जुना नैष्कर्म्यता । कर्माधारेच बा वर्तता । कर्म ते त्यागता । नैष्कर्म्यता नाही ॥४९॥

म्हणून ऐक पार्था । जया नैष्कर्म्यपदाची आस्था । तयाने उचित कर्म सर्वथा । सोडूच नये ॥५०॥

कर्माचं हे होणं जाणं । नाही आपुल्या अधीन । कर्म ते त्यागणं । अशक्य अर्जुना ॥५१॥

नीट विचार करता । आकळते कर्माची ती कथा । आकळता कर्मकथा । मोक्ष घडे ॥५२॥

जंववरी प्रकृतीचे अधिष्ठान । तंव सांडी मांडी हे अज्ञान । जे कर्म ते गुणाधीन । आपैसी असे ॥५३॥

विहित कर्म इंद्रियांचे । जरी ठरविले सोडायचे । तरी स्वभाव काय इंद्रियांचे । शमले कधी ॥५४॥

कानाने का ऐकणे थांबवले । डोळ्याने का पहाणे रोखले । नाकाने का कधी सोडले । वास घेणे ॥५५॥

श्वासाने ते थांबणे । मन निर्विकल्प होणे । तहानभूक ती खुंटणे । न घडे इच्छेपायी ॥५६॥

झोपणे जागणे का थांबले । चरण का चालणे विसरले । कधी आहे का निमाले । जन्ममृत्यू ॥५७॥

हे न घडे कधी काही । कर्म कधी सुटत नाही । म्हणून कर्म त्याग नाही । प्रकृती अधीना ॥५८॥

कर्म ते पराधीन । कर्म प्रकृतीचा गुण । कर्म न करीन म्हणणं । व्यर्थ अर्जुना ॥५९॥

बघ रथी ते चढणे । रथी स्थिर जरी बसणे । मग रथासंगे हिंडणे । आपोआप ॥६०॥

जैसे वायुकारणे । पाला पाचोळ्याचे उडणे । काही न करता भिरभिरणे । आकाशामाजी ॥६१॥

तैसे प्रकृतीकारणे । कर्म इंद्रियांचे रहाटणे । बघ कर्माचे ते घडणे । आपोआप ॥६२॥

जंववर संग प्रकृतीचा । तंववर त्याग न घडे कर्माचा । प्रयत्न करणे कर्मत्यागाचा । तो हट्टीपणा ॥६३॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जे उचित कर्म सांडती । नैष्कर्म होऊ पाहती । दाबती ते इंद्रियप्रवृत्ती । हट्टापायी ॥६४॥

तया कर्मत्याग न घडे । वासना मनी चरफडे । केवळ ते नाटक बापुडे । कर्मत्यागाचे ॥६५॥

मनी कामना वसता । अंतरी विषयासक्त असता । कर्म ते त्यागता । न घडे कर्मत्याग ॥६६॥

आता देई अवधान । तुजला बा मी सांगीन । निरीच्छ माणसाची लक्षणं । ऐक आता ॥६७॥

तया अंतरी दृढ । परमात्म्याची आवड । तरी लोक व्यवहाराची परवड । नाही तेथे ॥६८॥

तो इंद्रिया आज्ञा न करी । विषयांचे भय न धरी । प्राप्त कर्म न अव्हेरी । उचित जे जे ॥६९॥

प्रकृती अधीन कर्म व्यापार । न लोटी तो दूर । करून ही कर्म व्यापार । अलिप्त राही ॥७०॥

धरू न शकती तया कामना । मोहमळे तो लिंपेना । जसे पाणी ते लागेना । कमळपत्रा ॥७१॥

तैसा कर्मामाजी असे । इतरांसारखा दिसे । जैसे पाण्यात ते भासे । सूर्यबिंब ॥७२॥

तैसा वरी वरी सामान्य वाटतो । सर्वसाधारणच दिसतो । परि अंतरी तो असतो । असामान्य ॥७३॥

ऐशा चिन्हांनी युक्त । तोच असे मुक्त । जो सर्व आशापाश रहित । जाण अर्जुना ॥७४॥

म्हणून तू अर्जुना । जाणून या लक्षणा । त्यागून सर्व कामना । हो बा योगी ॥७५॥

ऐशी येता मनाची जाण । निश्चल होई अंत:करण । मग इंद्रियांचे आचरण । सहज अर्जुना ॥७६॥

म्हणोनी निष्कर्म्य ते होणे । देही ते न संभवणे । ते निषिद्धच असणे । देही असता ॥७७॥

म्हणोनी जे जे उचित । प्रसंगाकारणे प्राप्त । होऊनी तू हेतूरहित । आचरावे कर्म ॥७८॥

पार्था आणिकही एक । ऐक तू कौतुक । निष्कामताच ती कर्ममोचक । खरी अर्जुना ॥७९॥

ऐसा निष्काम कर्माच्या आधारे । स्वधर्म जो आचरे । तो निष्कामतेच्या द्वारे । पावे मोक्ष ॥८०॥

ऐसे निष्काम कर्म आचरण । तोच नित्य यज्ञ जाण । निष्काम होता मन । न घडे पाप ॥८१॥

कामासक्त होता मन । घडे स्वैर ते वागणं । कुकर्मी घडणे आचरण । बंध अर्जुना ॥८२॥

म्हणून निष्काम कर्म आचरण । तेच अखंड यज्ञयाजन । निष्कामतेठायी बंधन । नाही नाही ॥८३॥

हे जगत कर्माच्या अधीन । जे भूतकाळाचेच प्रकटन । झाल्याने कामना अधीन । दु:ख अर्जुना ॥८४॥

आता याविषयी पार्था । तुज सांगेन एक कथा । ऐक सृष्टीचा तो निर्माता । काय सांगे ॥८५॥

कर्माच्याच आधारे । झाले जगत निर्माण सारे । परि कर्मसिद्धांताची जाण रे । मनुष्या नाही ॥८६॥

तेव्हा मानवाने विनवले ब्रह्मास । येथे आधार काय आम्हास । कसे जगावे जीवनास । सांग देवा ॥८७॥

मग ब्रह्मदेव म्हणाला । मी स्वधर्म तुम्हा दिला । निष्कामपणे आचरता स्वधर्माला । मोक्ष घडे ॥८८॥

तुम्ही व्रत नियम न करावे । शरीराते न पीडावे । दूर कोठे न जावे । तीर्थासी गा ॥८९॥

योगादिक साधने । सकाम आराधने । मंत्रतंत्र विधाने । करू नका ॥९०॥

देवतांतरा न भजावे । हे सर्वथा काही न करावे । स्वधर्मानुधारे वर्तावे । सर्वकाळ ॥९१॥

सर्व हेतू सांडून । करा निष्काम आचरण । जसे पतिव्रतेचे मन । एकनिष्ठ ॥९२॥

तैसे हे स्वधर्म आचरण । मन निष्काम करून । जगणे आपले जीवन । साधना अर्जुना ॥९३॥

स्वधर्म तो भजता । कामधेनुच येते हाता । मन निष्काम होता । कामनापूर्ती ॥९४॥

ऐसे मन  निष्काम होता । प्रसन्न होती देवता । मग सर्वसुखाची प्राप्यता । आपोआप ॥९५॥

ऐसे स्वधर्म पूजणे । देवता प्रसन्न होणे । मग योगक्षेम भोगणे । निरंतर ॥९६॥

तुम्ही देवास भजाल । देव प्रसन्न होतील । ऐसी परस्परे घडेल । प्रीत तेथे ॥९७॥



For Complete Dnyaneshwari Visit :  www.esahity.com

तुम्ही जे जे म्हणाल । ते आपोआप होईल । इच्छा त्या पूर्ण होतील । सर्व तुमच्या ॥९८॥
वाचासिद्धी पावाल । सृष्टी नियंत्रण कराल । तुम्ही म्हणाल ते होईल । निष्काम होता ॥९९॥
जैसे वसंत तो येता । फळाफुलांची विपुलता । प्रकटते ती सुंदरता । सर्वदूर ॥१००॥
तैसे सर्व सुखासहित । भाग्य ते मूर्तिमंत । येईल तुम्हा शोधत । तुमच्यापाठी ॥१०१॥
ऐसे सर्व सुखयुक्त । व्हाल तुम्ही दु:खमुक्त । जर निष्काम कर्म आचरत । वर्ताल तुम्ही ॥१०२॥
सकल वैभव प्राप्त होता । इंद्रियांच्या अधीन जाता । विषय भोगासक्त होता । अनर्थ घडे ॥१०३॥
प्रसन्न होता देवता । प्राप्त होते सुखसंपन्नता । त्या देवासी न भजता । पाप घडे ॥१०४॥
न करणे यज्ञ हवन । न करणे देवतापूजन । ब्राह्मणा न देणे भोजन । अहितकारी ॥१०५॥
अतिथीचा आदर न करता । गुरुभक्तीस विन्मुख होता । बांधवा संतोष न देता । पाप घडे ॥१०६॥
ऐसा स्वधर्मक्रियारहित । होता भोगासक्त । अडकता मग विषयांत । दु:ख अर्जुना ॥१०७॥
ऐसा अनर्थ घडणे । सर्व सुख दूर जाणे । प्राप्त असूनही न भोगू शकणे । सुख अर्जुना ॥१०८॥
जैसे आयुष्याची सांगता । चैतन्य ते लोपता । वा नष्ट होते संपन्नता । दूर जाता लक्ष्मी ॥१०९॥
तैसे स्वधर्म जर सोडला । मग सर्व सुखाचा आधार गेला । जसा प्रकाश तो हरपला । विझता दिवा ॥११०॥
तैसे सकामता वाढता । तेथे संपते स्वतंत्रता । आणि मग मन संमोहनता । राज्य करी ॥१११॥
म्हणून स्वधर्म जो सांडील । तया काळ दंडील । चोर ते लुटतील । सर्वस्व त्याचे ॥११२॥
मग पात्र ते सकळ दोषास । दोष घेरतील तयास । भूते रात्री स्मशानास । घेरती जैसी ॥११३॥
मनी प्रगटते दु:खाची रास । सर्वकाळ भ्रमाचे भास । मग अशांतीचा वास । त्याचे ठायी ॥११४॥
ऐसा दु:खी तो होतो । रात्रंदिवस तळमळतो । दु:खातून कधीच न सुटतो । कल्पांतीही ॥११५॥
म्हणून स्वधर्मास न सोडावे । मन इंद्रियांसी आवरावे । निष्काम ते व्हावे । अंतरंगी ॥११६॥
मासा पाण्यात रहातो । पाण्यातून काढता मरतो । तैसा स्वधर्म जो सोडतो । मृत्यू त्यासी ॥११७॥
म्हणून तुम्ही समस्त । स्वधर्मी रहावे रत । निष्काम कर्मी होत । मुक्त व्हावे ॥११८॥
आपल्या मनास पहावे । सदैव निर्विकल्प रहावे । निष्काम कर्म करावे । सदोदित ॥११९॥
आपले दुर्गुण पहावे । गुण ते वाढवावे । दोष ते त्यागावे । क्षणोक्षणी ॥१२०॥
जगणे ऐसेच उचित । मुक्तीची हीच असे बा रीत । निष्काम ते होत । मुक्त व्हावे ॥१२१॥
ऐसे निष्कामपणे जगता । संपते दु:ख दैन्यता । प्रकटते ती शांतता । अंतरी त्यांच्या ॥१२२॥
निष्काम होता मती । सर्व दोष ते सरती । मग तयाच्या चित्ती । प्रकटे आत्मतत्त्व ॥१२३॥
मनी आत्मतत्त्व प्रकटता । संपे दु:ख भ्रांतता । घडे मग मुक्तता । भवचक्रातून ॥१२४॥
म्हणून स्वधर्म आचरता । मनी निष्काम होता । मग संस्कार ते संपता । घडे मोक्ष ॥१२५॥
यावाचुनी पार्था । वर्तूच नये अन्यथा । ऐसी आद्य ही कथा । सांगे श्री मुरारी ॥१२६॥
स्वत:सी देह मानणे । विषय भोगी अडकणे । कामना त्या वाढवणे । पाप अर्जुना ॥१२७॥
देह इंद्रिय आणि मन । जे मुक्तीचेच साधन । निष्कामता आचरून । मुक्त व्हावे ॥१२८॥
इंद्रियांच्या नादी लागणे । मनो कामना वाढवणे । ते बंधनात पडणे । आपोआप ॥१२९॥
इंद्रियानुभूती आणि मन । त्याच समीधा जाण । स्वधर्म यज्ञी त्या जाळून । मुक्त व्हावे ॥१३०॥
हे रहस्य न जाणता । मन इंद्रियांच्या नादी लागता । सुखलोलुप होता । दु:ख अर्जुना ॥१३१॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

हा यज्ञ सिद्ध होता । मनी प्रकटते प्रसन्नता । दु:ख दैन्यातून मुक्तता । अनुभवा येई ॥१३२॥
ऐसे हे मुक्तीचे साधन । जे इंद्रिय आणि मन । निष्काम ते होणं । रहस्य अर्जुना ॥१३३॥
सकामता वाढवता । संस्कार ते वाढता । भवचक्री अडकता । दु:ख अर्जुना ॥१३४॥
कामना कारणे जन्म । जन्माकारणे कर्म । म्हणून होऊन निष्काम । मुक्त व्हावे ॥१३५॥
कर्म उद्‌भवले ब्रह्मातून । ब्रह्म परम चैतन्यातून । म्हणून कर्म ब्रह्म चैतन्य । एक अर्जुना ॥१३६॥
कर्मी निष्काम होता । प्रकटते ब्रह्ममयता । अनुभवणे ती चैतन्यता । मुक्ती अर्जुना ॥१३७॥
ऐसी ही परंपरा । थोडक्यात सांगितली धनुर्धरा । जाणून या कर्म-व्यापारा । मुक्त व्हावे ॥१३८॥
कर्म सिद्धांतास जाणणे । निष्काम ते होणे । स्वधर्म आचरणे । रहस्य अर्जुना ॥१३९॥
इंद्रियभोगी अडकणे । तेच पाप करणे । मग भूमीस भार होणे । आपोआप ॥१४०॥
जन्मकर्म सकल । अर्जना अति निष्फल । जैसे का अभ्रपटल । अकालीचे ॥१४१॥
जैसे गळ्या स्तन बकरीचे । तैसे जीवन पहा यांचे । जंगल वाढता कामनांचे । दु:ख अर्जुना ॥१४२॥
म्हणून ऐक पांडवा । स्वधर्म कधीच न सांडावा । सर्वभावे भजावा । अहोरात्र ॥१४३॥
शरीर ते प्राप्त होता । ओघानेच येते कर्मकर्तव्यता । मग या स्वधर्म उचिता । का सांडावे ॥१४४॥
देह प्राप्त झाल्यावर । कर्माचा करणे अव्हेर । तो अनुचित बा व्यवहार । जाण अर्जुना ॥१४५॥
निष्काम कर्म आचरता । प्रकटते ती आत्मदिव्यता । आत्मतत्त्वास अनुभवता । न उरे कर्मबंध ॥१४६॥
ऐसा आत्मबोध प्रकटता । कृतकृत्य होता । होते भवचक्राची सांगता । कर्मासंगे ॥१४७॥
तृप्ती झाल्यावर जैसी । साधने सरती आपैसी । आत्मतृप्ता तैसी । नाही कर्मे ॥१४८॥
जोवरी अर्जुना । हा बोध भेटेना मना । तववरीच या साधना । अवलंबावे लागे ॥१४९॥
म्हणून होऊन अनासक्त । निष्काम कर्म आचरत । सदैव स्वधर्मीच वर्तत । रहावे अर्जुना ॥१५०॥
स्वकर्मी निष्काम होता । प्रकटते ती कैवल्यता । अनुभवता आत्मदिव्यता । मोक्ष घडे ॥१५१॥
निष्काम कर्म आचरूनं।मुक्त झाले जनकादि ज्ञानीजनं।म्हणून होण्या आत्मकल्याण।कर्म कर अर्जुना ॥१५२॥
याच कारणे पार्था । कर्मात असावी आस्था । आकळता कर्माची कथा । मोक्ष घडे ॥१५३॥
जो निष्काम कर्म करेल । तो इतरांना आदर्श होईल । मग स्वैराचार टळेल । इतरांचाही ॥१५४॥
निष्काम झाले ज्याचे मन । तो इतरांना आदर्श होईन । ऐसा आदर्श घालणं । कर्तव्य ज्ञान्याचे ॥१५५॥
आंधळ्यास मदत करणे । अज्ञजना आदर्श घालणे । निष्काम कर्म करणे । कर्तव्य अर्जुना ॥१५६॥
जर असे न घडेल । मग अज्ञजना काय उमजेल । मग ते कसे आचरतील । निष्काम कर्म ॥१५७॥
येथे श्रेष्ठ जे जे करती । तया नाम धर्म ठेवती । इतर तेच अनुष्ठिती । सामान्यजन ॥१५८॥
ऐशा या कारणे । कर्मत्याग न करणे । निष्काम कर्म करणे । कर्तव्य अर्जुना ॥१५९॥
आता इतरांच्या गोष्टी । मी सांगू कशासाठी । सर्व ही सृष्टी । कर्म माझे ॥१६०॥
कशासाठी हे कर्म घडणं । मज दु:ख ते कवण । तरी स्वधर्म आचरण । घडे मजठायी ॥१६१॥
परिपूर्ण माझ्या जैसा । जगी नाही दुसरा तैसा । सर्व सिद्धींचा वसा । माझे ठायी ॥१६२॥
मी यमाचा पराभव केला । मृत गुरुपुत्र आणला । स्वधर्म मी आचरीला । लोककल्याणा ॥१६३॥
परि मी स्वधर्मी वर्ते कैसा । सकाम का होय जैसा । ते या एकाच उद्देशा । लागोनिया ॥१६४॥
अवघे हे प्राणीजन । असती माझ्याच अधीन । त्यांचे व्हावे कल्याण । म्हणून आचरतो मी ॥१६५॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

मी पूर्णकाम होऊन । जर जाहलो आत्ममग्न । मग प्रजेचे कल्याण । कैसे होईल ॥१६६॥
जर निष्काम न होऊन । मी जर न केले कर्माचरण । मग सर्वांचे अकल्याण । होईल अर्जुना ॥१६७॥
म्हणून श्रेष्ठ जे असती । ते निष्काम करून मती । स्वधर्म ते आचरती । सर्वकाळ ॥१६८॥
आसक्त फलाठायी होऊनी । कर्म करती अज्ञानी । म्हणून अनासक्त होऊनी । वर्ते ज्ञानी ॥१६९॥
होण्या सर्व जिवांचे कल्याण । आदर्श ते घालणं । निष्काम ते होणं । कर्तव्य अर्जुना ॥१७०॥
कर्माधारेच वर्तावे । आदर्श ते घालावे । अलौकिक न व्हावे । लोकांप्रति ॥१७१॥
जया स्तनपानही कठीण । बालक पक्वान्न कैसे खाईन । तया पक्वान्न देणं । अहितकारी ॥१७२॥
जया कर्म समजत नाही । तया नैष्कर्म्यता न दावावी । निष्कर्मता न शिकवावी । तया अर्जुना ॥१७३॥
तेथे सत्क्रिया आचरावी । तीच एक प्रशंसावी । निष्कामपणे करावी । कर्मे आपण ॥१७४॥
करण्या लोककल्याण । करणे निष्काम कर्म आचरण । मग तया कर्मबंधन । नाही नाही ॥१७५॥
जसा बहुरुपी होता राजा राणी । स्त्री पुरुष भाव नाही मनी । परि लोकरंजनी । तो रमतसे ॥१७६॥
इतरांचे ते ओझे । जर आपुल्या माथा घेईजे । मग तयाखाली दडपिजे । आपोआप ॥१७७॥
तैसी शुभ अशुभ कर्मे । जे निपजती प्रकृती धर्मे । तिये मूर्ख मतिभ्रमे । म्हणे मी कर्ता ॥१७८॥
ऐसा अहंकारारूढ । एकदेशी जो मूढ । तया परमार्थ गूढ । न सांगावा ॥१७९॥
हे ऐसे प्रस्तुत । सांगितले तुज हित । ते अर्जुना देऊनी चित्त । ऐक आता ॥१८०॥
आत्मज्ञानियांच्या ठायी । अहंभाव जराही नाही । कर्माचं होणं जाणं पाही । प्रकृतीकारणे ॥१८१॥
ऐसा देहाभिमान सांडुनी । गुणकर्मे ओलांडुनी । ज्ञानी साक्षीभूत होऊनी । राहे जगती ॥१८२॥
जरी शरीर केले धारण । नच तया कर्मबंधन । सूर्याचं ते अलिप्त असणं । जसे जगती ॥१८३॥
प्रकृतीचेनि गुणे । विविध अनुभवांचे घडणे । तेथे मी कर्ता मानणे । अज्ञान अर्जुना ॥१८४॥
इंद्रिय ही गुणाधारे । वर्तती ती निजव्यापारे । तेथे अहंभाव बलात्कारे । कल्पू नये ॥१८५॥
तरी उचित कर्म आघवी । तू आचरूनी मज अर्पावी । परि चित्तवृत्ती असावी । आत्मतत्त्वी ॥१८६॥
हे कर्म मी कर्ता । का आचरेन या अर्था । ऐसा अभिमान चित्ता । येऊ न द्यावा ॥१८७॥
शरीरासी तादात्म्य तुटावे । सर्व इच्छांना सांडावे । मग प्रसंगोचित भोगावे । भोग सकळ ॥१८८॥
आता धनुष्य घेऊनी हाती । आरूढ हो या रथी । प्रकटू दे वीरवृत्ती । अर्जुना आता ॥१८९॥
जगी कीर्ती करावी । स्वधर्माचा मान वाढवी । या भारापासोनी सोडवी । या पृथ्वीला ॥१९०॥
आता पार्था निशंक होऊन । लढ एकाग्र चित्तानं । येथे आता यावाचून । उपाय नाही ॥१९१॥
हे स्पष्ट मत माझे । परम आदरे स्वीकारिजे । श्रद्धापूर्वक अनुष्ठिजे । ते धनुर्धरा ॥१९२॥
कर्म सिद्धांतास जाणता । नैष्कर्म्य होऊन वर्तता । मग कर्मबंधातून मुक्तता । आपोआप ॥१९३॥
प्रकृती अधीन होणं । इंद्रियभोगी अडकणं । सकाम ते होणं । अज्ञान अर्जुना ॥१९४॥
माझे मत अव्हेरून । आज्ञाभंग तो करून । सकाम कर्म करणं । दु:ख अर्जुना ॥१९५॥
जैसे विषयभोगी अडकून । मोहमदिरा पिऊन । उन्मत्त ते होणं । दु:खदायी ॥१९६॥
देखे प्रेताच्या हाती दिधले । जैसे रत्न का वाया गेले । जन्मांधा का दिसले । दृश्य कधी ॥१९७॥
चंद्राचा उदय जैसा । कावळ्याच्या उपयोगी कैसा । मूर्खा विवेक तैसा । रुचेच ना ॥१९८॥
तैसे ते पार्था । जे विमुख या परमार्था । तयासी संभाषण सर्वथा । करूच नये ॥१९९॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

म्हणोनी ते न मानती । निंदाही करू लागती । सांग पतंग का साहती । प्रकाशा ते ॥२००॥
पतंगाचे दिव्यास अलिंगन । तेथे त्यासी अचूक मरण । तेवि विषयाचरण । मृत्यू अर्जुना ॥२०१॥
ऐसी ही इंद्रियांची कहाणी । जाणतात बा ते ज्ञानी । या इंद्रिया लाडावोनी । ठेवूच नये ॥२०२॥
ते तर सर्पाशी खेळणं । व्याघ्रा लाडीगोडी लावणं । जैसे विषाचं सेवन । मृत्यू अर्जुना ॥२०३॥
खेळ खेळता अग्नी लागला । मग तो दूर पसरला । तैसा इंद्रिया लळा दिधला । भला नोहे ॥२०४॥
एरवी तरी अर्जुना । या शरीरा पराधीना । विषयभोग ते नाना । देऊच नये ॥२०५॥
करून अनेक सायास । मिळवावे कशासाठी वैभवास । नाशवंत या देहास । लाडावू नये ॥२०६॥
नाना कष्ट करणे । अपार संपत्ती मिळवणे । स्वधर्माचरण सोडणे । भोगासाठी ॥२०७॥
हा पाचाचा मेळावा । विलीन होईल पंचतत्त्वा । मग येतो पस्तावा । मृत्यूसमयी ॥२०८॥
म्हणून केवळ देहभरण । ती जाण उघड नागवणं । त्या इंद्रियांच्या नादी लागणं । चूक अर्जुना ॥२०९॥
इंद्रियांचिया मता । विषयभोग देता । सुख वाटते चित्ता । तात्पुरते अर्जुना ॥२१०॥
करता चोरांची संगत । न टळेच ती फसगत । तैसी इंद्रियांची सोबत । फसवी अर्जुना ॥२११॥
जर गोडीचे कारणे । विष ते प्राशन करणे । मग आपोआप मरणे । विष घेता ॥२१२॥
इंद्रियाठायी इच्छा असणे । तेथे आशेचे प्रकटणे । जैसे माश्याचे फसणे । गळी अर्जुना ॥२१३॥
तैसे इंद्रियामाजी गळ आहे । जो प्राणासी घेऊन जाये । तो दिसतच नोहे । झाकले कारणे ॥२१४॥
जर इंद्रियांच्या नादी लागशील ।विषयांची आशा धरशील ।क्रोधाग्नीत मग जळशील ।आशा दुरावता ॥२१५॥
जैसे चारी बाजूंनी । पारधी सापळे लावूनी । सशास मग अडकवूनी । मारती ठार ॥२१६॥
इंद्रिय पारधीच असती । नको तयांची संगती । कामक्रोधाची वस्ती । इंद्रिया कारणे ॥२१७॥
इंद्रियांचा आश्रय न घ्यावा । मनी आठवही न धरावा । निजवृत्तीचा तो ओलावा । सोडूच नये ॥२१८॥
अगा स्वधर्म हा आपला । कठीण जरी वाटला । तरी हाच अनुष्ठीला । कल्याणकारी ॥२१९॥
श्रेयस्कर ते स्वधर्म अनुसरण । व्यर्थ ते परधर्मानुसरण । स्वकर्मी कर्मबंध संपणं । कल्याणकारी ॥२२०॥
पहा शूद्राघरी आघवी । पक्वान्ने आहेत बरवी । ती द्विजे केवि सेवावी । जरी गरीब झाला ॥२२१॥
ऐसे अनुचित कैसे करावे । अयोग्य का इच्छावे । वा अयोग्य का सेवावे । सांग अर्जुना ॥२२२॥
लोकांचे ते बंगले । पाहुनिया चांगले । आपण झोपडे आपले । मोडावे का ॥२२३॥
पत्नी ती आपुली । कुरूप जरी जाहली । तरी भोगता तीच भली । जैसी अर्जुना ॥२२४॥
जरी वाटे संकटपूर्ण । आचरण्या बा कठीण । तरी स्वधर्म आचरण । कल्याणप्रद ॥२२५॥
साखर टाकता दुधात । गोड असे लागत । परि घातक कृमी दोषात । जशी अर्जुना ॥२२६॥
हे माहीतही असून । हट्टाने केले साखर सेवन । मग रोगाचे ते वाढणं । अनिवार्य अर्जुना ॥२२७॥
जे इतरांसी जरी उचित । परि आपल्यासाठी अनुचित । ते न आचरावे किंचित । कदापि अर्जुना ॥२२८॥
करता स्वधर्म आचरण । जर गेला जरी प्राण । तरी होतसे ते कल्याण । दोन्ही लोकी ॥२२९॥
ऐसा श्रेष्ठ शिरोमणी । जेधवा बोलला शारंगपाणी । तेथ अर्जुन म्हणे विनवणी । असे देवा ॥२३०॥
हे जे तुम्ही सांगितले । ते सकळ मी ऐकले । आता विचारेन मी आपुले । मनातील देवा ॥२३१॥

अर्जुन उवाच

देवा हे होते कसे । ज्ञानियांचीही स्थिती भ्रंशे । मार्ग सोडूनी भलतेसे । करती आचरण ॥२३२॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ते तत्त्वज्ञान जाणतात । तया मोक्षांचा उपायही माहीत । परि व्याभिचार ते करतात । कवणे गुणे ॥२३३॥
बीज आणि भुसा । आंधळा निवडू नेणे जैसा । परि डोळसही वागे तैसा । आंधळ्यापरि ॥२३४॥
संसार ते सोडतात । नि जंगलात बा जातात । मग जंगलातही कंटाळतात । संसारासाठी ॥२३५॥
पापी न तयांची मती । सर्वस्वी पापे चुकवती । परि शेवटी पाप करती । अनायासे ॥२३६॥
कशामुळे संमोहित होऊन । पापाचरण करती जन । पाप करण्याची इच्छा नसून । का घडे पाप ॥२३७॥

श्री भगवानुवाच

तेव्हा हृदयकमळआरामू । जो योगीयांचा निष्काम कामू । तो म्हणतसे पुरुषोत्तमू । ऐक आता ॥२३८॥
हे कामक्रोध पाही । तेथे दया अजिबात नाही । यमाचे हे जातभाई । जसे अर्जुना ॥२३९॥
हे ज्ञाननिधीचे भुजंग । विषय दरीचे वाघ । भजन मार्गाचे मांग । हत्यारे जे ॥२४०॥
कामक्रोधाचे कारणे । मनइंद्रियांचे भटकणे । अहंम्भावाचा भ्रम होणे । यांचेच पायी ॥२४१॥
मानसाचे रजोगुण । ती आसुरी संपत्ती जाण । या कामक्रोधा कारण । दु:ख अर्जुना ॥२४२॥
हे रजोगुणातून जन्मले । परि तमोगुणे वाढले । प्रमादी अविवेकी झाले । तमाकारणे ॥२४३॥
मृत्यूच्या त्या नगरात । यांना सच्चे मित्र मानतात । वैरी हे आहेत । जिवाचे अर्जुना ॥२४४॥
आता ऐक आशेला । जी चालवते भवचक्राला । विश्वही अपुरे तियेला । ऐसी भूक तिची ॥२४५॥
कौतुके कवळीता मुठी । जिये चौदा भुवने थेकुटी । भ्रांती ती धाकटी । बहीण आशेची ॥२४६॥
या तिन्ही लोकांना । जी भ्रमात ठेवते नाना । ती ही तृष्णा । दासी भ्रांतीची ॥२४७॥
आशा भ्रांती तृष्णाकारणे । अहंकाराचे भवचक्र चालणे । या अहंकाराकारणे । दु:ख अर्जुना ॥२४८॥
ऐशा या अहंकाराकारणे । सत्याचे ते लोपणे । मग दंभ रूढ होणे । जगामाजी ॥२४९॥
वाढता ती दंभता । पसरते अशांतता । माया वैभव वाढता । बाटे धर्म ॥२५०॥
ऐसे विवेकाचे संपणे । वैराग्याचे खंगणे । मग वासनांचे वाढणे । आपोआप ॥२५१॥
वासना त्या वाढता । समाधान ते संपता । मावळता सहनशीलता । आनंद कैसा ॥२५२॥
ऐसा विवेक संपता । कामना त्या वाढता । मग तापत्रयाची सत्ता । सर्वदूर ॥२५३॥
ऐसा प्रताप कामक्रोधाचा । सर्वत्र अनुभव दु:खाचा । पराभव केला ब्रह्मादिकांचा । कामक्रोधांनी ॥२५४॥
कामक्रोध चैतन्याचे शेजारी । बसती ज्ञानाच्या एका हारी। मग पसरते महामारी। दु:खाची अर्जुना ॥२५५॥
हे जळेविण बुडविती । आणि आगीवीण जाळती । चूपचाप प्राण घेती । सर्वांचा पहा ॥२५६॥
हे शस्त्रेवीण मारती । दोरेवीण ते बांधती । ज्ञानियासही वधती । घेऊन पैज ॥२५७॥
चिखलावीण गाडती । जाळ्यावीण अडकवती । अति चिवट हे असती । वर्णनातीत ॥२५८॥
जैसे चंदनाचे मुळाला । साप वेटोळे घालून बैसला । वा झाकतेसे गर्भाला । वार जैसा ॥२५९॥
सूर्य का असतो प्रकाशावीण । वा अग्नी कधी धूरविहीन । धूळरहित का दर्पण । असे कधी ॥२६०॥
तैसे कामक्रोधावीण । क्वचित असे ज्ञान । कोंड्यावीण धान्य कण । नसती जसे ॥२६१॥
ऐसे ते शुद्ध ज्ञान । झाकले तया कामक्रोधानं । म्हणून ज्ञान प्राप्त होणं । अतिकठीण अर्जुना ॥२६२॥
आधी कामक्रोधा जाळावे । मग ज्ञानास पावावे । तववरी न संभवे । ज्ञान अर्जुना ॥२६३॥
कठीण कामक्रोधा संपवणे । त्यासाठी जे प्रयत्न करणे । ते आगीत इंधन घालणे । जाण अर्जुना ॥२६४॥
येथे उपाय जे करतात। ते अधिक कामी-क्रोधी होतात । हठयोग्यासही जिंकतात। हे कामक्रोध ॥२६५॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

या कामक्रोध जिंकण्याचा । एक उपाय आहे साचा । कर अवलंब त्याचा । जर शक्य तुला ॥२६६॥
मनइंद्रियास जाणता । कर्ममायेस ओळखता । सर्व संस्कार संपता । ज्ञान होते ॥२६७॥
अर्जुना इंद्रिय असती बलवान।मन त्याहूनही शक्तिमान।बुद्धी सूक्ष्म मनाहून। नि त्यापलीकडे आत्मज्ञान ॥२६८॥
होता बा आत्मज्ञान । विरते ते मन । मग कामक्रोधाचं संपणं । आपोआप ॥२६९॥
मनाची संपता गती । कामक्रोध ते संपती । जैसी मृगजळाची समाप्ती । किरण संपता ॥२७०॥
अहंभाव भ्रम संपता । मन लया जाता । रागद्वेष विरता । ब्रह्मस्थिती ॥२७१॥
हाच गुरुशिष्य संवाद । जे असे ब्रह्मपद । मोक्ष निर्वाण निर्विवाद । तेथे आहे ॥२७२॥
सर्व सिद्धांचा भूपति । लक्ष्मीयेचा तो पती । ऐसा अर्जुनाप्रति । बोलता जाहला ॥२७३॥
आता तो भगवान । गोष्ट सांगेल महान । मग करेल अर्जुन । प्रश्न तेथे ॥२७४॥
ऐसा उपदेश गहन । सांगेल तो भगवान । प्राप्त होई सुखसमाधान । श्रवण करता ॥२७५॥
ज्ञानदेव म्हणे निवृत्तीचा । कान करून जिवाचा । हा संवाद कृष्ण अर्जुनाचा । ऐकावा बापा ॥२७६॥

ॐतत्सदिति श्रीमद्‌भगवद्‌गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे कर्मयोगोनाम तृतियोऽध्याय: ॥३॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# ॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट। वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वाऱ्यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणाऱ्या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधू नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु ह्रदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

---

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

---

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्‌गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पांडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

---

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे हृद्‌गत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान ®

www.esahity.com

## श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळयांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

## ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९६७४८२०